संक्षिप्त फौ. ख. क्र.३४७/२०२४
सरकार -वि.- चेतन उमक
नि.क्र. १० खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अयुबखान अजीजखान पठान,
वय ४९ वर्षे, व्यवसाय – होमगार्ड,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखत नाही. दिनांक २६.०७.२०२४ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलाविले नव्हते. मी पोलीस स्टेशनला असताना पोलिसांनी माझी सही घेतली. पोलिसांनी माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नाही. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.११** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.०७.२०२४ रोजी पोलिसांनी मला मौजा टि पॉईट तहसील रोड, भिवापूर, ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष एक दुचाकी वाहन एम.एच.४०-ए.डी.५९४७ थांबविले व त्या वाहन

चालकाचे वाहन चालविण्याची पध्दत अनियंत्रीत दिसून आली त्यामुळे त्याने मद्य प्राशन केले आहे असे दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, त्याला थांबविलेल्यानंतर मी त्याच्या तोंडाचा वास घेतला असता त्याने मद्य प्राशन केले असल्याचा आंबट उग्र वास आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझरने त्याची तपासणी केली असता मद्यांकाचे प्रमाण ११६.४ एम.जी. इतके दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, त्या व्यक्तीला त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव चेतन उमक असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी जितेंद्र बोरकरला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री सुखदेवे यांचे मार्फत</u>

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १०.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.